# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- १९/०२/२०१८

## *पॉन्झी स्किमव्दारे गुंतवणुकदारांची होणाऱ्या फसवणुकी पासून सावधान*

सध्या विविध खाजगी कंपन्या या पॉन्झी स्किमव्दारे अभिकर्ताचे मार्फतीने आर.डी., फिक्स डिपाजिट, अपघाती विमा, पेन्शन अशा प्रकारच्या योजना राबवून ठेवीदारांकडून मोठया प्रमाणात रकमा गोळा करून ठेवीदारांना कमी कालावधीत जास्त कमीशन किंवा व्याज देण्याचे आमीष दाखवून ठेवी ठेवण्यास अप्रामाणीकपणाने प्रोत्साहित करून ठेवींचे हितसंबंधाचे रक्षण न करता तसेच ठेवीदारांच्या ठेवीमधून ठेवीदारांचा फायदा होईल असे कोणतीही योजनेची व्यवस्था न करता नियोजनपुर्वक संगणमताने कट रचुन, समान उद्देशाकरीता कंपनी कायदयाचे पालन न करता तसेच सदर योजना राबविण्यास सेबीने मनाई केली असतांना सुध्दा मोठया प्रमाणात ठेवी स्वीकारून ठेवीची मुदत पुर्ण झाली असतांना सुध्दा विश्वासाने सोपविण्यात आलेल्या रकमेचा अपहार करून ठेवीदारांना त्यांची रक्कम परतफेड न करता स्वत:चे फायदयाकरीता वापरून ठेवीदारांची आर्थिक फसवणुक करीत असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत.

अशाप्रकारच्या विविध खाजगी कंपन्यामध्ये पॉन्झी स्किमव्दारे अभिकर्ताचे मार्फतीने आर.डी., फिक्स डिपाजिट, अपघाती विमा, पेन्शन अशा योजना राबवुन गुंतवणुकदारांची मोठया प्रमाणात वारंवार आर्थिक फसवणुक करीत असल्याने नागरीकांनी जास्त व्याज दराचे आमिषाला बळी न पडता खाजगी कंपन्यामध्ये पॉन्झी

स्किमव्दारे आर्थिक गुंतवणुक करू नये. असे आवाहन गडचिरोली जिल्हा पोलीस विभागामार्फत करण्यात आले आहे.